ISSN : 2278-8204

INTERNATIONAL MONTHLY RESEARCH JOURNAL FOR ALL SUBJECT

# AKSHARDEEP

Year - IV
October - 2015

*Editor*
*Ganesh Lahane*

अभ्यास होऊ लागला आणि मग त्याचे अनुकरण करताकरता मराठी वाङ्मयाने त्याला स्वीकारले.

(आल्फा ऑफ धी प्लाऊ हे गार्डिनरचे टोपण नाव) आल्फा ऑफ दि प्लाऊच्या लघुनिबंधांची 'ए फेलो ट्रॅव्हलर', 'ऑन् ए डिस्टण्ट व्ह्यू ऑफ ए पिंग', ऑन टॉक अॅण्ड टॉकर्स', 'ऑल अबाऊट ए डॉग्', 'स्लीप अॅण्ड थॉट', 'ऑन् लिव्हिंग अगेन', इत्यादी शीर्षके; व्हायकाऊंट ग्रे चवे 'दि प्लेझर ऑफ रीडिंग; मॅक्स बीरबॉमचे 'इकॅबॉड'; डब्ल्यू.आर.इंजचे 'डायरीज' अशी शीर्षके – या शीर्षकांना लक्षात ठेवून 'ऐन पंचविशी', 'पहिले चुंबन', 'अंधारी रात्र', 'पहिला पांढरा केस', 'उघडं गुपित' (ना.सी.फडके); 'शिव्या', 'नवा खिसा', 'थोडे अविचारी व्हा' (वि.स.खांडेकर); 'थापा', 'मोठे शून्य', 'चोर आणि चांदणे', 'काळेपणा, गोरेपणा आणि सौंदर्य' (अनंत काणेकर) अशी मराठीतील लघुनिबंधांची शीर्षके वाचली आणि दोहोंची तुलना केली की त्यातील साम्य तर लक्षात येतेच पण इंग्रजीतील या 'पर्सनल एसे' नामक आत्मनिष्ठ वाङ्मयप्रकाराचे अनुकरण आपल्या मराठी लेखकांनी किती लगोलग आणि झपाट्याने केले याची सहजच कल्पना येते.

इंग्रजीत तरी तो आपोआप कुठे निर्माण झाला होता.

इंग्रजीत तो आला होता फ्रान्स आणि इंग्लंडमधील डोव्हर खाडी ओलांडून फ्रेंच भाषेतून!

फ्रेंचमणील 'एसाय्' चा लेखक मॉंटेन हा लघुनिबंधाचा प्रवर्तक होय. तो म्हणायचा– "I am myself the subject of my book" (माझ्या लेखनाचा विषय मीच आहे)

लघुनिबंधात थेट लेखक 'मी' असतो – थेट लेखक 'मी' शिरलेला असतो याचे मूळ वरील सूत्रात आहे.

लेखनाचा विषय थेटपणे जर 'मी' च असेल तर त्या 'मी' ची जेवढी आणि जितकी रूपे असतील आणि होऊ शकतील तितक्यांवर आणि तेवढ्यांवर लिहिले गेले तर ते अगदी स्वाभाविक होय.

इंग्रजीत हा मॉंटेनचा निबंध जसाच्या तसा आला नाही. बेकनने त्याचे मूळचे मोकळे स्वरूप बदलले. त्याला वैचारिक, तार्किक असे स्वरूप दिले. बेकन हा एक तत्त्वज्ञ (आणि न्यायाधीश) होता, त्यामुळे त्याच्या लेखनाचे स्वरूप त्याच्या तत्त्वज्ञ व्यक्तित्वासारखेच झाले. मराठीमधील निबंध स्वत:चे रूप आकारित होता – शोधीत होता तेव्हा त्याच्या आगेमागे बेकनच्या निबंधांची मराठीत भाषांतरे झाली होती. पण बेकनने निबंध आणि त्यांच्या धर्तीवरचे निबंध लिहिले जात

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Terrorism And Human Rights | Ardale S. D. & Kurhe S. B. | 01 |
| 2. | A Role Of Agriculture In Indian Economy | Jadhav Sandeep | 02 |
| 3. | Knowledge Management and Its Three Pillars use in Academic Library | Ubhale Vilas | 04 |
| 4. | Emotional Maturity among Highly Educated and Low Educated Male and Female. | Nila Pratibha | 08 |
| 5. | नरेंद्र कोहली के आतंक उपन्यास में पुरुष मानसिकता | भुरे बालाजी | 10 |
| 6. | स्त्री विमर्श : अवधारणा एवं स्वरूप | शेलदरकर गायत्री | 12 |
| 7. | भारतीय स्वातंत्र्याचा महामानव महात्मा गांधी : एक आकलन | धोंड श्रीहरी | 14 |
| 8. | मराठी ग्रामीण / प्रादेशिक कादंबरी | धस श्रीराम | 17 |
| 9. | स्वातंत्र्योत्तर मराठी ग्रामीण साहित्याचे वेगळेपण | मुनगेलवार अनिल | 19 |
| 10. | जागतिकीकरण व ग्रामीण साहित्य | भानुसे विठ्ठल | 21 |
| 11. | राजन गवस यांच्या 'कळप' आणि 'तणकट' या कादंबऱ्यातील मूल्यविचार | चव्हाण अंकुशकुमार | 26 |
| 12. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे शिक्षण विषयक विचार | जाधव सूर्यप्रकाश | 33 |
| 13. | वाणिज्य शिक्षणाची दिशा व अपेक्षा | वजीर प्रभाकर | 38 |
| 14. | स्वातंत्र्य संग्रामातील आदिवासी समाजाचे योगदान | वळवी यशवंत | 41 |
| 15. | महात्मा ज्योतीराव फुल्यांचे स्त्रीशिक्षण विषयक कार्य आणि योगदान | धांडेकर रीता | 43 |
| 16. | ग्रामीण विकासाचे लेखामेंठा प्रारूप | पिल्लेवान कुंदन | 48 |
| 17. | माहितीचा अधिकार २००५ | बने रेखा व भागवत डी. आर. | 51 |
| 18. | सामाजिक न्याय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर | सोनाळे चंदन | 54 |
| 19. | महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता | मुळूक एस. एस. | 57 |
| 20. | मध्ययुगीन भारतातील हिन्दु स्त्रीचे सामाजीक जीवन | साळुंके वाय. एम. | 60 |
| 21. | वैदिक कालीन सामाजिक जीवन | चव्हाण विजय | 65 |
| 22. | भारतीय स्वातंत्र्य युद्धातील आर्यपुरूष | केमटवाड व्ही. डी. | 70 |

असतानाच त्यांना मागे टाकून पुढे जाण्याची प्रक्रिया इंग्रजीत सुरू झाली होती त्यातूनच 'पर्सनल एसे' (personsl essay) – याला ना.सी.फडके 'गुजगोष्ट' म्हणायचे – आत्मनिष्ठ निबंध आला. बेकनप्रणीत निबंध आत्मनिष्ठ नव्हता. 'स्व' ला किंवा 'मी' ला महत्त्व देणारा नव्हता. 'माझा विषय मीच' अशी त्याची धारणा नव्हती. आत्मनिष्ठ निबंधाची 'माझा विषय मीच' अशी धारणा होती. हाच आत्मनिष्ठ निबंध गार्डिनर, लिंड, चेस्टर्टन, ल्यूकास, बीरबॉम, इंज इत्यादींना प्रेरक ठरला.

लघुनिबंधाची (प्रथम त्याला essay म्हणत असले तरी वास्तविक personal essay ची) व्याख्या वर्णनात्मक, सर्वसमावेशक आणि विद्यार्थी स्वरूपाची होती. त्याचे स्वरूप वाचक लक्षात घेऊन सांगितले जात होते. उदाहरणार्थ :-

"तो (लघुनिबंध) स्वरूपाने–आकाराने हकीकतवजा, वर्णनात्मक किंवा स्पष्टीकरणात्मक असू शकतो. विषयांतर करणारा, नाहीतर टीकात्मक किंवा आत्मकथनात्मक किंवा वादविवादात्मकही असतो. आकारात तो कमी अधिक होऊ शकतो; तो गंभीर किंवा क्षुद्र, उत्कंठावर्धक किंवा उपरोधिक नाहीतर भावनात्मक किंवा उपहासात्मक असू शकतो. त्याचा विषय साधासुधा तसेच प्रगल्भही असेल; बनयनसारख्या लेखकावर (प्रिलग्रिन्स प्रोग्रेस नावाचे पुस्तक बनयनने लिहिले. ते जगातील एक उत्कृष्ट पुस्तक म्हणून गणले जाते.) नाहीतर क्षितिजावर किंवा ग्लवेच्या लेबलावर तसेच गोंगाट करणाऱ्या शाळेतल्या पोरांवरही तो लिहिता येतो."

व्हर्जिनिया वुल्फ लघुनिबंधाबद्दल असे म्हणते :

"निबंधाने पहिल्या शब्दापासूनच वाचकाला मुग्ध करायला हवे आणि शेवटचा शब्द वाचला की त्याला प्रसन्न, टवटवीत करायला हवे. दरम्यान निबंध वाचताना त्याला मनोरंजन, आश्चर्य, उत्कठा, क्रोध इत्यादींचा अनुभव – वेगवेगळ्या परींचा अनुभव आला पाहिजे. कधी कल्पनेच्या उंच भरारीवर तो आरूढ झाला पाहिजे तर कधी विद्वत्तेच्या, बौद्धिकतेच्या गहिऱ्या खोल तळाशी तो बुडला पाहिजे..."

वरील दोन्ही (उद्‌धृत) परिच्छेद वाचले की सगळ्याच गोष्टींचा अंतर्भाव त्यात केला गेल्याचे लक्षात येते. थोडक्यात, 'मी' ला जे जे भिडेल ते ते सर्व लघुनिबंधाचे विषय होऊ शकत होते. त्यामुळे इंग्रजी लघुनिबंधामध्ये वरवर जे अगदी सामान्य विषय आहेत असे वाटेल ते ते सारे विषय आलेले दिसतात. (उपर्युक्त उल्लेख केलेली शीर्षके वाचावीत.) म्हणूनच त्या विषयांवरचे लेखन ही लेखकाच्या मनाची स्वैर क्रीडाविलसिते आहेत असे वाटू लागले. जॉन्सनसारखा विचक्षणी लेखकही लघुनिबंध म्हणजे a loose sally of the mind (मनाची स्वैर

Research Paper
In
History

International Monthly Research Journal For All Subject, Akshardeep

65
ISSN 2278-8204
Vol.IV. Issue : IV,
Octomber, 2015

# वैदिक कालीन सामाजिक जीवन

प्रा. विजय के. चव्हाण
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
ओझर (मिग)

**प्रस्तावना :** भारताच्या इतिहासपूर्वकालीन संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर इंडो - आर्यन भाषीक टोळ्यांनी वायव्य भारतात प्रवेश केला. याच इंडो - आर्यन लोकांनी भारतात वैदिक संस्कृती रूजवली आणि तिचा विस्तार केला भारताच्या इतिहासात हा कालखंड वैदिकयुग म्हणून ओळखला जातो. कारण ह्याच काळात निर्माण झालेले वैदिक ग्रंथ हे या कालखंडाच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे प्रमुख ऐतिहसिक साधन आहेत. वैदिक संस्कृती विकसित करणारे लोक आर्य म्हणून ओळखले जातात. काही अभ्यासकांच्या मते आर्य हा शब्द वंशवाचक नसून भाषावाचक आहेत. आर्यांच्या वैदिक वाङ्मय इतके प्राचीन व विविधतापूर्ण साहित्य जगात इतरत्र बघावयास मिळत नाही.

इतिहासकारांनी दोन ठळक टप्पांमध्ये या कालखंडाची विभागणी केली असून त्यापैकी पहिला कालखंड ऋग्वेद कालखंड (इ. स. पूर्व १५०० ते १०००) आणि दूसरा कालखंड म्हणजे उत्तर वैदिक कालखंड (इ. स. पूर्व १००० ते ६००) विभागण्यात आला आहे.

आर्यांच्या मूळ स्थानाबाबत विधानांमध्ये एक वाक्यता नाही. काही इतिहासकारांच्या मते इराणच्या उत्तेरस कॅस्पियन समुद्राच्या पुर्वेस मध्य आशिया आर्यांचे मूळ स्थान असावे तर लोकमान्य टिळक यांनी उत्तर ध्रुव हे आर्यांचे मूळ वस्ती स्थान असल्याचे म्हणतात. तर अविनाश चंद्ररास यांनी आर्यांचे मूळ वस्तीस्थान सप्तसिंधु नद्यांच्या परीसरातच आहे असे म्हटले आहे. कोणीडॅन्युबचेखोरे, मध्ययुरोप, असे अनेक अंदाज बांधण्यात येतात. परंतु त्यास ठोस असा पूरावा मिळत नाही. पण आर्यांच्या आगमनाने म्हणजेच त्यांच्या स्थलांतराने सुपिक जमीन, वाढती लोकसंख्या, पशुपालन, हवामानातील बदल अशा अनेक कारणांनी, त्यांनी आपले मूळ स्थान सोडून टोळ्या करून वेगवेगळ्या दिशांनी निघाल्या तव जेथे गेल्या तेथील लोकांशी त्यांची संघर्ष झालेत आर्यांनी आपले वर्चस्व सिद्ध केलेत, भारतात येण्याअगोदर ते इराणमध्ये होते, त्यांच्या टोळ्या पूर्वेकडे निघाल्यात खैबर खिंडीमार्गे त्यांनी सप्तसिंधुच्या प्रदेशात प्रवेश केला. येथील लोकांशी त्यांचा संघर्ष झाला त्यांनी अनार्यांचा पराभव करून हे लोक सप्तसिंधूच्या प्रदेशात स्थायिक झालेत व वैदिक संस्कृतीचा उदय झाला. पुढे अनर्यांची संस्कृती व आर्यांच्या संस्कृतीचा संगम होऊन भारतीय संस्कृती उदयास आली.

**ऋग्वेद कालीन सामाजिक जीवन :** ऋग्वेद काळात समाज कसा होता याची माहीती नमूद करणे आवश्यक आहे. आर्य लोक भारतात आले त्यावेळी त्यांनी भटके जीवन संपवून स्थिर जीवनास सुरूवात केली. पशुपालनाबरोबरच ते एका ठिकाणी राहून शेती व्यवसायही करू लागले. थोडक्यात आर्यांची समाज व्यवस्था उत्तम प्रकारची होती.

**१. कुटुंब जीवन :** वैदिक काळात सामजिक जीवनामध्ये व्यक्तीपेक्षा कुटुंबास महत्वाचे स्थान होते. कुटुंब हा समाजाचा महत्वाचा घटक होता. एकत्र कुटुंब व्यवस्था असल्याने तीन पिढ्यांचे लोक कुटुंबात एकत्र नांदत. पितृसत्ताक कुटूंबपद्धत असल्याने कुटूंब प्रमुखास 'दंपत्ती' किंवा 'गृहपती' असे म्हणत. कुटुंबातील जेष्ठ व्यक्ती गृह पती असे. त्यावर कुटुंबाची सर्व जबाबदारी असे तसेच कुटुंबावर त्याची सत्ता असे. मुलांवर योग्य संस्कार करणे, देवदेवतांची पुजा, गुरुंचा आदर करणे, असे सद्गुण कुटूंबात रूजविणे ही त्याची जबाबदारी असे. या काळाच्या कुटूंब संस्था लहान मुलांसाठी आदर्श नीतीसंस्कार करणाऱ्या पाठशाळा होत्या. कुटूंबातील मंडळी विभक्त होण्याच्या वेळी उत्पन्नाच्या वाटण्या होत असत. थोडक्यात सर्वसाधारणपणे आर्यांचे कौटुंबिक जीवन सुखी आणि समाधानी दिसून येते.

क्रीडा - भटकंती, बागडणे) असे म्हणू लागला.

मराठी लेखकाला अभ्यासक्रमातून का होईना पण जेव्हा हा लघुनिबंध वाचावयाला मिळाला तेव्हा त्याला काहीतरी नवे गवसल्यासारखे वाटले. त्यातील वरवरचे सोपेपण त्याला मानवले. खरोखर या सोपेपणाला मनाल स्वैर क्रीडेपेक्षा मुक्त चिंतनाचा असा एक पक्का थर अंतर्यामी होता. 'ऑल अबाऊट ए डॉग' सारखे लघुनिबंध वाचले की वरील विधानाचा अर्थ कळेल. मराठीतही लघुनिबंध लिहिले जाऊ लागले.

खांडेकरांनी ना.सी. फडके यांच्या गुजगोष्टींबद्दल म्हणजेच लघुनिबंधाबद्दल जे लिहिले आहे, ते प्राय: एकूण मराठी लघुनिबंधाबद्दलही म्हणता येईल, खांडेकर लिहितात :

''फडक्यांचे... निबंध आपापल्यापरी चांगले व वैशिष्ट्यपूर्ण असले, तरी लघुनिबंधाच्या कलेला रंगत आणणाऱ्या काही गोष्टीविषयी त्यांना विशेष आवड नसावी असे त्यावरून वाटते. लघुनिबंधकाराच्या वाङ्मयविषयक आवडीनिवडी त्याच्या लिखाणात प्रतिबिंबित होणे अपरिहार्य असते पण... आपल्या... निबंधातही फडके सहसा कुठल्याही साहित्यिकाचा, कलाकाराचा आणि त्याच्या कलाकृतीचा उल्लेख करीत नाहीत... वाङ्मयीन संदर्भाप्रमाणे पौराणिक संदर्भही त्यांच्या लघुनिबंधात आढळत नाहीत.'' (परिजात १९५२, प्रास्ताविक, पृ. १२)

फडके हे जवळजवळ १९४0 पर्यंत साहित्यातील एक 'परवलीचा शब्द' होते. कथनात्मक साहित्यप्रकारांच्या बांधणीचे, रचनेचे त्यांनी आराखडे मांडले होते. बोलल्यासारखी वाटणारी भाषा या प्रकारांमध्ये आणून त्यांनी साहित्याची गौर सजवली होती. या बांधणीचे, रचनेचे अनुकरण मराठी लेखक खूप आवडीने करीत होता. लघुनिबंधाबाबत बोलायचे तर एका अनुकरणात हे दुसरे अनुकरण मिसळले आणि थोड्याच काळात 'कृतक' लघुनिबंध लिहिला जाऊ लागला. त्यामुळे लघुनिबंध नटवा झाला. मनाची स्वैर क्रीडा गेली. क्रीडेचा नाटकी आविर्भाव तसेच खोट्या तत्त्वचिंतनाचा आव मात्र उरला. परिणामी जितक्या भराभरा हा लघुनिबंध भराला आला तितक्याच भराभरा तो खुंटूनही गेला.

▲▲▲

International Monthly
Research Journal For All
Subject, Akshardeep

66

ISSN 2278-8204
Vol.IV. Issue : IV,
Octomber, 2015

**२. स्त्रीजीवन :** ह्या कालखंडात स्त्रियांना मोठे मानाचे आणि आदराचे स्थान प्राप्त झाले होते. स्त्रीयांना समाजात मान होता. मात्र पुरूषांपेक्षा दुय्यम स्थान होते. वैदिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे स्थान दिले जाई. ह्या समाजात बुरखापद्धती नव्हती किंवा सती जाण्याची चालही अस्तित्वात आलेली नव्हती. युद्धासाठी मुलांची गरज असली तरी, मुलींची हत्या होत नव्हती. मुलींना शिक्षण दिले जात होते. त्यांचा योग्य सांभाळ केला जात होता. स्त्रीयांना जीवन साथी निवडण्याचा अधिकार होता. विवाहानंतर ती पतीच्या घरी पाठविण्यात येई. माता होणे हे प्रत्येक स्त्री भाग्याचे मानी, जास्त पुत्र असणाऱ्या स्त्रीला समाजात आदर होता. स्त्रीया वेदाभ्यास करत असत. वेद निर्माण करण्यामध्ये उर्वशी , विश्ववरा, लोपमुद्रा, मेधा, घोष्पा, रोमशा, शिकता या स्त्रीयांनी याकाळात वेदांच्या ऋचा व सुक्ते रचली आहेत. स्त्रीयांना सार्वजनिक जीवनात भाग घेता येत होता. विवाहापूर्वी पित्यावर व विवाहानंतर पतीवर तिला अवलंबून राहावे लागत असले तरी गृहस्वामीनी ह्या नात्याने स्त्रीचे कुटुंबातील स्थान अत्यंत महत्वाचे होते.

**३. विवाहसंस्था :** या कालावधीत विवाह संस्थाही कुटुंब संस्थेचा प्रमुख आधार होती. धर्मानुसार १६ संस्कारपैकी विवाह हा पवित्र संस्कार होता. या काळात अविवाहीत राहणे त्याज्य मानले जात होते. विवाह पद्धतीचे अनेक धार्मिक विधी सांगितले होते. या काळात युवक - युवती प्रेम भावनेतून आई - वडिलांच्या इच्छेने विवाह करून शकत होते. त्यांना आपला जीवन साथी निवडण्याचा अधिकार होता. मात्र अंतिम निर्णय पिताच घेत असत. या काळात प्रेम आणि पैशासाठी विवाह झाल्याचे दिसते. वंशवृद्धी , संरक्षण यासाठी जास्त मुले असणाऱ्या स्त्रीला थोर समजण्यात येई. विवाह प्रसंगी देव, ब्राह्मण, अग्नीच्या साक्षीने धर्म विधी केले जात. एक पत्नी व्रत होते. क्षत्रिय लोकांमध्ये अनेक विवाह करण्याची पद्धत होती. सगोत्र, सकुळातील विवाह याकाळात रूढ नव्हते. हुंडा देण्याची पद्धत होती. नववधुस 'गृहस्वामीनी ' म्हणत असत.

**४. वर्णव्यवस्था :** ऋग्वेद कालीन समाज व्यवस्था वर्ण व्यवस्थेशी संबंधित होती. आर्य लोक वर्णाने गोरे होते. अनार्य लोक काळे होते. आर्य स्वतःला श्रेष्ठ, उच्चवर्णाचे समजत. अनार्याला ते हिन, दास, शुद्र समजत. प्रारंभी आर्य लोक वेगवेगळे व्यवसाय करीत होते. त्यावेळी त्यांच्यात वर्ण, जाती नव्हत्या. परंतू याकाळात वर्ण जन्मावरून नव्हे तर व्यवसाया वरून ठरू लागला आणि त्यावरूनच वर्ण व्यवस्था उदयास आली. प्रथम गुण क्रमानुसार वर्ण बदलत गेलेत. वर्णव्यवस्था आदर्श व चार प्रमुख वर्णात विभागले गेलेत.

**अ. क्षत्रिय :** क्षत्रिय हा वर्ण अत्यंत महत्त्वाचा वर्ग होता. जे लोक धाडसी, शूर होते ते क्षत्रिय बनलेत. जनतेचे संरक्षण ही त्याकाळची गरज असल्याने क्षत्रिय काम करणाऱ्या या लोकांना महत्त्व होते. आर्य टोळ्या धाडसी व पराक्रमी होत्या. क्षत्रिय विद्येचे अध्ययन व पालन करण्यासाठी शूर, पराक्रमी, लढाऊ लोक पुढे येत असत. त्यांच्यावर समाजाच्या रक्षणाची जबाबदारी असे. क्षत्रिय लोक राज्याचे राजश्री होते.

**ब. ब्राम्हण :** पुर्व वैदिक काळात वर्ण व्यवस्थेत ब्राह्मण वर्गास फार महत्व होते. या वर्गात बुद्धीमान, ज्ञानी लोक असत. हा वर्ग अध्ययन, अध्यापन, यज्ञ अशी काम करीत असत. सर्व ज्ञान व वेद मुखोद्गत करून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे शुद्ध स्वरूपात जतन करण्याचे काम केले जाई. या वर्गास समाजात प्रतिष्ठा होती. यज्ञकर्म, धर्मविधी, चिंतन, मंत्रपठण अशी कामे ते करीत. पुरोहिताचे काम त्यांना करावे लागे. याच वर्गाने वाङ्मयाची निर्मिती केली. उदा. वशिष्ठ, विश्वामित्र, भारद्वाज, अत्री, वामदेव इत्यादी श्रेष्ठ ऋषी या वर्गात होऊन गेलेत.

**क. वैश्य :** क्षत्रिय व ब्राह्मणां व्यतिरिक्त उरलेला आर्यांचा वर्ग म्हणजेच वैश्य होय. या वर्गाची समाजात मोठी संख्या होती. हा वर्ग संपत्ती व धन संचय निर्माण करणारा होता. शेती, व्यापार , पशुपालन व इतरही व्यवसाय केले जात होते. शारीरिक श्रम, कष्ट, मेहनत करणारा हा वर्ग होता. या वर्गाला समाजात कमी महत्व होते. त्यांना हलक्या